**<u>ठळक बातम्या</u>**

- जागतिक आव्हानांचा सामना करत देशाच्या अर्थव्यवस्थेनं गेल्या आर्थिक वर्षात ७ पूर्णांक ६ दशांश टक्के वृद्धिदर गाठल्याचा रिझर्व बँकेचा अहवाल
- यंदाच्या मान्सूनमधे सरासरीच्या ९० टक्के पावसाचा अंदाज
- शारजाहून पेट्रोलियम घेऊन भारताकडे निघालेलं आणखी एक जहाज होर्मुझमधून पार
- नीट पेपरफुटी प्रकरण अतिशय गंभीर असून, आता २१ जून रोजी होणारी पुनर्परीक्षा सुरळीतपणे व्हावी ही सरकारची जबाबदारी असल्याचं शिक्षणमंत्र्यांचं प्रतिपादन

**आणि**

- महिला क्रिकेटमधे  इंग्लंडबरोबर टी-ट्वेंटी मालिकेतला पहिला सामना जिंकून भारताची आघाडी

**<><><><><>**

जागतिक आव्हानांचा सामना करत देशाच्या अर्थव्यवस्थेनं गेल्या आर्थिक वर्षात ७ पूर्णांक ६ दशांश टक्के वृद्धीदर गाठल्याचं रिझर्व बँकेच्या वार्षिक अहवालात म्हटलं आहे. २०२५-२६चा वार्षिक अहवाल भारतीय रिझर्व बँकेनं आज प्रसिद्ध केला. सर्वात वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था हे स्थान भारतानं या वर्षातही कायम राखलं. जागतिक स्तरावर इंधन दरवाढ, पुरवठा साखळीतले व्यत्यय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतल्या समस्या ही आव्हानं असली तरी भारतीय अर्थव्यवस्था मजबूत पायावर उभी असल्यानं पुढच्या काळात आर्थिक वाढीला चालना मिळेल, असं अहवालात म्हटलं आहे. २०२६-२७ मधे महागाई दर ४ टक्क्यावर रोखण्याचं उद्दिष्ट अहवालात नमूद केलं आहे.

थेट लाभ हस्तांतरण योजनांचा निधी डिजिटल चलनाच्या स्वरुपात वितरित करण्याचा विचार असल्याचं या अहवालात म्हटलं आहे.

**<><><><><>**

यंदा जून ते सप्टेंबरच्या कालावधीत होणारा मोसमी पाऊस सरासरीच्या ९० टक्केच पडेल, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. नवी दिल्लीत आज मान्सून हंगाम २०२६च्या दुसऱ्या टप्प्यातील दीर्घकालीन हवामान अंदाजाविषयी विभागाचे संचालक डॉ. मृत्युंजय मोहपात्रा यांनी माध्यमांना माहिती दिली. एल निनो परिस्थितीमुळे देशात यंदाचा नैऋत्य मान्सून दीर्घकालीन सरासरीपेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. या हंगामात भारतातल्या पावसाच्या स्थितीबद्दल ते यावेळी म्हणाले...

**होल्ड... बाईट - मृत्युंजय मोहपात्रा**

येत्या जून महिन्यात उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब, बिहार, ओडिशा, छत्तीसगड आणि गुजरातच्या अनेक भागांमध्ये उष्णतेची तीव्र लाट येण्याची शक्यताही हवामान विभागानं वर्तवली आहे.

**<><><><><>**

शारजाहून पेट्रोलियम घेऊन भारताकडे निघालेल्या 'निसोस केरॉस' या तेलवाहू जहाजाने होर्मूझची सामुद्रधुनी यशस्वीपणे पार केली असून ते ३ जून रोजी विशाखापट्टण बंदरात पोचेल. जहाजांच्या वाहतुकीचा माग घेणाऱ्या काही संस्थांच्या माहितीनुसार हे जहाज आज सकाळी भारताच्या पश्चिम किनाऱ्याजवळ पोचलं होत. इराणच्या आयआरजीसी नौदलाने गेल्या २४ तासांत २३ व्यापारी जहाजांना होर्मूझची सामुद्रधुनी पार करण्याची परवानगी दिल्याचं वृत्त इराणच्या वृत्तसंस्थेने दिल होत.

होर्मूझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या सर्व जहाजांवर वाहतूक शुल्क आकारण्याचा इराणचा प्रस्ताव आहे, तर आंतरराष्ट्रीय सागरी मार्गावरच्या

वाहतुकीवर असं शुल्क आकारणे  बेकायदेशीर असल्याचं संयुक्त राष्ट्रांनी म्हटलं आहे. होर्मूझच्या सामुद्रधुनीतली सर्व वाहतूक निःशुल्क असावी असं अमेरिकेनेही म्हटलं आहे.

<><><><>

'आंतरराष्ट्रीय संयुक्त राष्ट्र शांतता रक्षक दिना'निमित्त परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी आज जगभरात सेवा बजावणाऱ्या संयुक्त राष्ट्रांच्या शांतता रक्षकांना अभिवादन केले. जागतिक शांतता आणि सुरक्षितता राखण्यासाठी त्यांची ही समर्पित सेवा जगातील अत्यंत आव्हानात्मक परिस्थितींमध्येही एक महत्त्वपूर्ण बदल घडवून आणत आहे, अशा शब्दांत डॉ. जयशंकर यांनी जगभरातील शातंता रक्षकांचा गौरव केला.

<><><><>

भारत आणि कॅनडा या दोन्ही देशांनी या वर्षाअखेरपर्यंत 'सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करार' पूर्ण करायचा निर्णय घेतला आहे. यामुळे दोन्ही देशांमधल्या व्यापार आणि गुंतवणुकीला मोठी चालना मिळणार आहे. भारताचे वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल आणि कॅनडाचे आंतरराष्ट्रीय व्यापार मंत्री मनिंदर सिद्धू यांच्यात झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

दोन्ही देशांमधल्या व्यवसाय वाढीसाठी आणि रोजगाराच्या नवीन संधी निर्माण करण्यासाठी हा करार अत्यंत फायदेशीर ठरेल असा विश्वास दोन्ही मंत्र्यांनी व्यक्त केला. या वेळी दोन्ही मंत्र्यांच्या हस्ते 'कॅनडा-भारत व्यापार आणि गुंतवणूक मंचा'चं उद्घाटन करण्यात आलं. हा मंच दोन्ही देशांमधल्या व्यावसायिक नेत्यांना एकत्र आणून नवीन भागीदारी सुरू करायला मदत करेल.

<><><><>

नीट पेपरफुटी प्रकरण हे अतिशय गंभीर असून आता २१ जून रोजी होणारी पुनर्परीक्षा सुरळीतपणे व्हावी ही सरकारची जबाबदारी असल्याचं केंद्रीय शिक्षण मंत्री

धर्मेंद्र प्रधान म्हणाले. नवी दिल्ली इथे ते दूरदर्शन वार्ताहराशी बोलत होते. आता होणाऱ्या परीक्षेच्या संपूर्ण प्रक्रियेत एकही चूक होऊ नये, यासाठी खबरदारी घेण्यात येत आहे, असं धर्मेंद्र प्रधान म्हणाले. पेपरफुटी प्रकरण सीबीआयकडे सोपवण्यात आलं असून दिवसेंदिवस त्यात नवनवीन खुलासे होत आहेत. त्यामुळे या प्रकरणाच्या मुख्य सूत्रधारापर्यंत पोहोचून आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी यासाठी प्रयत्न सुरू आहेत, असं प्रधान म्हणाले.

**<><><><>**

एनटीए अर्थात राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं, नीट-यूजी परीक्षेसाठीचा शुल्क परतावा मिळण्याकरता बँक खात्याचे तपशील सादर करण्याची अंतिम मुदत २२ जूनपर्यंत वाढवली आहे. आधी ही मुदत २६ मे पर्यंत होती. मात्र, नोंदणी केलेल्या २३ लाख विद्यार्थ्यांपैकी केवळ १३ लाख विद्यार्थीच त्या मुदतीत तपशील सादर करू शकले होते.

पेपरफुटीमुळे रद्द केलेली ही परीक्षा २१ जून रोजी नव्यानं घेतली जाईल, त्यासाठी कोणतेही शुल्क आकारलं जाणार नाही अशी घोषणा एनटीएनं या पूर्वीच केली होती. तसंच विद्यार्थ्यांनी यापूर्वी भरलेलं परीक्षा शुल्क त्यांना परत केलं जाईल, असंही एनटीएनं स्पष्ट केलं होतं. त्या अनुषंगानं ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप तपशील सादर केले नाहीत त्यांना ही प्रक्रिया पूर्ण करणं सुलभ व्हावं या उद्देशानं ही मुदतवाढ दिल्याचं एनटीएनं स्पष्ट केलं.

उमेदवार त्यांचे प्रवेश-तपशील वापरून नीट यूजी २०२६ या नोंदणी पोर्टलवर लॉग-इन करू शकतात आणि बँक खात्याचे तपशील सादर करण्यासाठी 'रिफंड लिंक'चा वापर करू शकतात, असे स्षष्ट करतानाच एनटीएने बँक खात्याचे तपशील सादर करण्याची ही सुविधा २२ जूनला रात्री ११:५० वाजेपर्यंतच उपलब्ध राहील

<><><><><>

देशभरातल्या उच्च न्यायालयांनी प्रलंबित खटल्यांवरचे आदेश, राखून ठेवल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत जाहीर करावेत, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं आज दिले. खटल्याच्या सुनावणीत होणाऱ्या विलंबामुळे पक्षकारांचं होणारं नुकसान लक्षात घेऊन सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या खंडपीठानं हा निर्णय घेतला. वैयक्तिक स्वातंत्र्यासंबंधीच्या खटल्यांमध्ये जलदगतीनं निर्णय होण्याची आवश्यकता असल्याचंही सर्वोच्च न्यायालयानं अधोरेखित केलं. जामीन अर्जांवरचे आदेश त्याच दिवशी जाहीर करावेत, जर ते राखून ठेवले असतील तर दुसऱ्या दिवशी जाहीर करून न्यायालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करावेत. जामीन किंवा शिक्षेच्या निलंबनाचा आदेश जारी होताच तो संबंधित तुरुंग प्रशासनाला कळवून त्याच दिवशी किंवा जास्तीत जास्त दुसऱ्या दिवशी त्याची अंमलबजावणी करावी, असे निर्देश न्यायालयानं दिले आहेत.

<><><><><>

कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी काल, मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. राज्यपाल थावरचंद गहलोत यांनी त्यांचा राजीनामा स्वीकारला असून पुढचं सरकार स्थापन होईपर्यंत काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून काम पाहायला सांगितलं आहे. कर्नाटकचे भावी मुख्यमंत्री म्हणून डी. के. शिवकुमार यांचं नाव चर्चेत आहे. सिद्धरामय्या यांनी सर्वाधिक काळ कर्नाटकचं मुख्यमंत्रीपद भूषवलं आहे.

<><><><><>

तीन सामन्यांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट मालिकेतील पहिल्या सामन्यात, इंग्लंडचा ३८ धावांनी सहज पराभव करत भारतीय महिला संघाने १-० अशी आघाडी घेतली. चेम्सफोर्ड येथील काउंटी क्रिकेट मैदानावर खेळल्या गेलेल्या सामन्यात भारतानं प्रथम फलंदाजी स्वीकारत निर्धारित २० षटकांत ७ गड्यांच्या

मोबदल्यात १८८ धावा केल्या.  त्याचा पाठलाग करताना इंग्लंडला २० षटकांत ८ गड्यांच्या मोबदल्यात केवळ १५० धावाच करता आल्या. ४० चेंडू ६९ धावा काढणारी जेमिमा रॉड्रिग्ज हिला सामनावीर म्हणून घोषित करण्यात आलं. दुसरा टी-२० सामना उद्या ब्रिस्टल इथे भारतीय वेळेनुसार सायंकाळी ७ वाजता खेळला जाईल.

**<><><><><>**

फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत अव्वल मानांकित महिला टेनिसपटू अरिना सबालेंका ने फ्रान्सची एल्सा जॅक्मो हिला काल चुरशीच्या सामन्यात हरवून तिसऱ्या फेरीत प्रवेश केला. आता तिचा सामना ऑस्ट्रेलियाच्या डारिया कासात्किनाबरोबर होईल.

**<><><><><>**

आय पी एल क्रिकेट स्पर्धेत, पात्रता फेरीच्या दुसऱ्या सामन्यात, आज, गुजरात टायटन्स विरुद्ध राजस्थान रॉयल्स सामना रंगणार आहे. चंडीगढ मधे महाराजा यादविन्द्र सिंह मैदानावर संध्याकाळी सात वाजता सामन्याला सुरुवात होईल. पात्रता फेरीच्या पहिल्या सामन्यात, रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू संघाने गुजरात टायटन्स संघाचा पराभव केला होता.

**//<><><><><>//**